Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 728 – 732

DOI: 10.5281/zenodo.10279402

**Original Research Article**

# महात्मा गांधीजींच्या जीवनातील मुलभूत संकल्पना

प्रा. डॉ. सखाराम यशंतवराव गोरे

ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय, वसंतनगर (को) ता. मुखेड जि. नांदेड, महाराष्ट्र

*Corresponding author E-mail*: mahi.vish@yahoo.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

**प्रस्तावना**

मोहनदास करमचंद गांधी यांचे स्थान भारतातच नव्हे तर जगात अद्वितीय होते. ते आदर्शवादी व युगप्रवर्तक नेते होते. ते प्रामुख्ययाने अध्यात्मवादी व मानवतावादी विचारवंत म्हणून ओळखले जातात. धर्म आणि राजकारण यांचा सुंदर समन्वय साधुन त्यांनी राजकारणाला व्यवहारीक अशी नवी अध्यात्मदृष्टी दिली. मानवता हा त्यांचा केंद्रबिंदू असून मानव मुळातच चांगला असतो यावर त्यांची श्रध्दा होती. साध्य आणि साधन सुचिता हा त्यांच्या विचाराचा गाभा असून अन्ययाचा प्रतिकार सत्य, अहिंसा व सत्याग्रहच्या मार्गाने करता येतो हे त्यांनी आपल्या विचारातून व कृतीतून दाखवून दिले. बलाढ्य साम्राज्य शक्तीचा प्रतिकार अहिंसेच्या मार्गाने करता येतो हे त्यांनी जगाला दाखवून दिले.

गांधीजीचे तत्वज्ञान हे जीवनात त्यांनी घेतलेल्या अनुभवावर आधारीत होते. गांधीजींची भूमिका तत्वचिंतकाची नव्हती. सभोवतालच्या जगापासून दूर राहून तत्वचिंतनात रममाण होणारे ते नव्हते. साक्षात राजकारणात अग्रभागी राहून स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करणारे ते नेते होते. स्वत: गांधीजीनीच एके ठिकाणी म्हटले आहे. गांधीवाद नावाचे कोणतेही तत्व नाही, आणि माझ्या पाठिमागे कोणताही असा पंथ चालू व्हावा अशी माझी इच्छा नाही. मी नवे तत्व किंवा सिध्दांत शोधून काढला असा दावा ही मला करायचा नाही. फक्त मी आपल्या दैनंदिन जिवनातील समस्यांना माझ्या स्वत:च्या पध्दतीने चिरंतन सत्य लागू करण्याचा प्रयत्न करुन पाहिला.

काही मुलभूत तत्वावर श्रध्दा ठेवून त्याआधारे जीवनातील समस्यांची उकल करण्याचा गांधीजींचा प्रयत्न होता. त्यांच्या सर्व विचारांना वास्तववादी बैठक लाभलेली आहे. त्यांनी काही उदात्त ध्येय बाळगली पण त्यांचा ध्येयवाद म्हणजे स्वप्नरंजन नव्हते त्याला वास्तव परिस्थितीचा आधार होता.

### गांधीजींच्या तत्त्वज्ञानातील मूलभूत संकल्पना

सत्य, अहिंसा, सत्याग्रह व गांधीजींच्या विचारातील काही मूलभूत संकल्पना होत. या सर्वच संकल्पना त्यांच्या मूळ आध्यात्मिक अधिष्ठानाशी निगडित आहेत; नव्हे त्यातूनच त्या स्वाभाविकपणे विकसित होतात. म्हणजे मूळ आध्यात्मिक प्रमेयातून उपसिद्धान्ताच्या रूपाने गांधीजी या सर्व संकल्पना विकसित करतात. पैकी सत्याविषयीची चर्चा वर आलीच आहे. अहिंसा आणि सत्याग्रहाचा येथे विचार करू.

### अहिंसा

सत्य आणि अहिंसा यांच्यामध्ये गांधीजी निकटतम संबंध प्रस्थापित करतात. सत्याप्रमाणेच अहिंसेलाही आध्यात्मिक आशय देऊन तेथून ऐहिक जीवनाच्या विविध स्तरांवर या संकल्पनेचा आविष्कार कसा होऊ शकतो आणि कसा व्हावयास हवा हे दाखवतात. हे संपूर्ण विश्वच ईश्वराचे रूप आहे किंवा निराळया शब्दात आपल्यासह संपूर्ण विश्व हे एकच सेंद्रिय अस्तित्वाप्रमाणे एकरूप आहे. हे एकवेळ मान्य केल्यास इतरांविषयीच्या परकेपणाच्या भावनेस स्थानच उरत नाही. द्वेष, तिरस्कार, हेवा या सारख्या भावनांचा उगम या परकेपणाच्या भावनेत असतो आणि हिंसा या भावनेचा आविष्कार असतो. तेव्हा हिंसेचा उगम परकेपणाच्या भावनेत म्हणेजच विश्वात्मक एकतेसंबंधीच्या अज्ञानात आहे.

एकाच शरीराचे भिन्न अवयव जसे परस्परांचा द्वेष करू शकत नाहीत त्याचप्रमाणे ईश्वराच्या एकाच मूर्तरूपाचे आपण सारे भाग आहोत यासंबंधीचे ज्ञान परकेपणाचा नाश करते. त्यामुळे द्वेष तिरस्कार, हेवा, सूड इत्यादींची जागा प्रेम, सद्भाव, सहानुभूती, अनुकंपा, सहकार्य या भावना घेतात. अशा स्थितीत हिंसेचे मूळच नष्ट झाल्याने माणसाच्या विचार आणि कृतीतून परिपूर्ण अहिंसा आविष्कृत होऊ लागते. गांधीजी लिहितात, “जेव्हा माझ्यासह संपूर्ण विश्व एकाच सर्वव्यापी ईश्वराचे रूप आहे तेव्हा एखाद्यास दुष्ट किंवा आपला शत्रू मानून त्याचा तिरस्कार मी कसा करू ? मी एखाद्याबद्दल भीती तरी कशी बाळगू किंवा एखाद्यास भेडसाऊ तरी कसा? एखाद्यास मी दुसऱ्या कोणापेक्षा अधिक जवळचा तरी कसा मानू ?”

वरील विवेचनावरून सत्य आणि अहिंसा यातील अन्योन्य संबंधही स्पष्ट होतो. आपल्यासह संपूर्ण विश्व एकाच ईश्वराचे मूर्तरूप आहे हे सत्य. या सत्याविषयीच्या ज्ञानाचा जो आचरणात्मक आविष्कार होतो ती अहिंसा.

हिंसा आणि अहिंसा यातील भेद स्पष्ट करताना गांधीजी म्हणतात की एख्याद्यास शारीरिक किंवा मानसिक दुखापत करणे किंवा पिडा देणे म्हणजे हिंसा आणि तसे न करणे म्हणजे अहिंसा, अशा ढोबळ पद्धतीने त्यातील भेद स्पष्ट करता येणार नाही. त्यासाठी त्या कृती मागील उद्देश किंवा हेतू किंवा प्रेरणा तपासावी लागेल. द्वेषामुळे एखाद्याने दुसऱ्यास दुखापत केली किंवा नुसता त्याचा अपमान करून त्यास मानसिक क्लेश दिला तरी ती हिंसा होईल. परंतु रोग्याचा प्राण वाचविण्यासाठी आवश्यक असल्यामुळे डॉक्टरने त्याचा एखादा अवयव कापून टाकला तरी ती हिंसा होणार नाही. ती परिपूर्ण अहिंसा असेल. तेव्हा द्वेष, मत्सर, स्वार्थ यातून होणारे कृत्य ही हिंसा तर प्रेमोद्भव कृत्य ही अहिंसा.

हिंसपेक्षा अहिंसा अनेक दृष्टीने कशी श्रेष्ठ आहे तेही गांधीजी समजावून देतात. अहिंसेत आत्मक्लेश अभिप्रेत असतो. आत्मक्लेशाची मानसिक सिद्धताच माणसाला अहिंसक बनवते. त्यामुळे यशाने तो उन्मत होत नाही की पराभवाने वैफल्यग्रस्त होत नाही. यश आणि अपयश दोन्हीचा स्वीकार तो शांत चित्ताने करतो कारण यश हे त्याचे नसते, ते सत्याचे असते. त्यामुळे अहिंसावादी विजयाने उन्मत होण्याचा प्रश्नच येत नाही. शिवाय सत्याला पराजय माहीत नसतो. तेव्हा आजचा पराभव विजय लांबणीवर पडला एवढेच दाखवतो. त्यामुळे अहिंसावादी वैफल्यग्रस्तही होत नाही. राहतो प्रश्न पराभवातून ओढवणाऱ्या अडचणींचा. तर आत्मक्लेशाची त्याची तयारीच असते. हिंसात्मक मार्गाचा अवलंब करणाऱ्यांचे

तसे नसते. पहिली गोष्ट म्हणजे तो सत्य किंवा असत्य यासाठी लढत नसून स्वतः साठी लढत असतो. त्यामुळे संघर्षातील यशापयश त्याचे असते. शिवाय आत्मक्लेशाची त्याची तयारी नसते. त्याची भिस्त इतरांना क्लेश देण्यावर असते. म्हणून विजयाने तो उन्मत्त बनतो तर पराभवाच्या परिणामांचा विचार करून आतल्या आत खचत असतो, वैफल्यग्रस्त होतो. उन्मत्तता आणि वैफल्यग्रस्तता दोन्ही गोष्टी वाईटच, त्यातून पुढे अनेक अनर्थाचा जन्म होतो.

अहिंसा हे दुबळेपणाचे लक्षण नाही असे गांधीजी म्हणत. अहिंसा आणि दुबळेपणा या दोन परस्पर भिन्नच नव्हे तर परस्परविरोधी गोष्टी आहेत. अहिंसा म्हणजे क्षमाशीलता. शिक्षेचे सामर्थ्य असणाऱ्यांच्या क्षमाशीलतेला अर्थ असतो. दुबळ्या आणि व्यक्तीने क्षमाशीलतेचा आव आणण्यात काय अर्थ आहे ? उंदीर हा मांजरीकडून होणारे आक्रमण सहन करतो. तेव्हा तो मांजरीस क्षमा करीत असतो असे म्हणणे हास्यास्पद आहे.

अहिंसेच्या नावाखाली भित्रेपणाचे समर्थनही करता येणार नाही. या दोन्ही गोष्टी पण परस्परविरोधी आहेत. गांधीची लिहितात-

“अहिंसा आणि भित्रेपणा या परस्परविरोधी कल्पना आहेत. अहिंसा हा सर्वश्रेष्ठ सद्‌गुण आहे... भित्रेपणा हा सर्वात वाईट दुर्गुण आहे. अहिंसा प्रेमातून उद्भवते. भित्रेपणा द्वेषाचा परिणाम असतो. अहिंसा नेहमी आत्मक्लेशाची प्रेरणा देते, तर भित्रेपणा दुसऱ्यास क्लेश देण्यास उद्युक करतो. परिपूर्ण अहिंसा हा उत्कट शौर्याचा आविष्कार असतो. त्यामुळे तो माणसाचे नैतिक अध: पतन कधीच होऊ देत नाही, तर भित्रेपणा माणसाचे नैतिक अध: पतन नेहमीच करीत असतो.”

गांधीजी पुढे जाऊन म्हणतात की, भित्रेपणा किंवा हिंसा यापैकी एकाची निवड करण्याचा प्रसंग आल्यास मी हिंसेची निवड करीन कारण भित्रेपणा माणसाला इतका लहान बनवतो की तो दडपणांना सहजपणे बळी पडतो आणि आपल्या स्वातंत्र्याचे किंवा तत्त्वाचे किंवा स्वतःचे सुद्धा रक्षण करू शकत नाही. भित्रा मनुष्य सत्याचा आग्रह धरू शकत नाही. दडपणांना बळी पडून तो असत्य सुद्धा स्वीकारतो. कारण त्याची आत्मक्लेशाची तयारी नसते.

परंतु गांधीजी म्हणतात की, असा प्रसंगच येणार नाही. कारण अहिंसेमध्ये प्रचंड शक्ती असते. शेवटी अहिंसेपुढे हिंसा पराभूत होणारच. ते लिहितात, “अहिंसा ही अपराजित शक्ती आहे. तिच्यातील प्रचंड शक्तीला दिपून गेल्याने आम्ही तिच्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतो.... अहिंसा हे निर्भय व अपराजित आत्म्याचे खास वैशिष्ट्य आहे.”

**सत्याग्रह :-**

शाश्वत सत्य आणि सापेक्ष सत्य अशी सत्याच्या दोन अवस्थांची कल्पना गांधीजी करतात हे वर आलेच आहे. या विश्वामागील चिरंतन सत्य ते शाश्वत किंवा अंतिम सत्य तोच ईश्वर या विश्वाच्या घडामोडीत दडलेले सत्य हे सापेक्ष सत्य. हे त्या अंतिम सत्याचे म्हणजे ईश्वराचे प्रतिबिंब. तेव्हा ईश्वर भक्तीची सुरुवात विश्वात्मक सापेक्ष सत्याच्या सेवेपासून होते. या सापेक्ष सत्याचा त्याग करून अंतिम सत्याची प्राप्ती होऊ शकत नाही. तात्पर्य, हे की ईश्वरापर्यंत पोचण्यासाठी ऐहिक जीवनापासून निवृत्त होण्याची आवश्यकता नाही, उलट आवश्यकता आहे ती या ऐहिक जीवनात सक्रिय सहभाग घेण्याची, त्यांच्या विविध अंगात दडलेले सत्य शोधून ते प्रस्थापित करण्यासाठी स्वयंप्रेरणेने क्रियाशील होण्याची. तेव्हा सत्याविषयीचा हा आग्रह ईश्वर प्राप्तीचा मार्ग आहे. यासच गांधी सत्याग्रह म्हणतात. तेव्हा सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह, सत्याची आराधना. परंतु सत्य म्हणजे ईश्वर. म्हणून सत्याची आराधना म्हणजे ईश्वराची आराधना. या अर्थाने सत्याग्रह हा धर्म आहे.

सत्याग्रही सत्याचा उपासक असतो. तो सत्यासच ईश्वर मानतो. त्यामुळे राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा कुठल्याही विश्वात्मक घडामोडीत दडलेल्या सत्याकडे तो दुर्लक्ष करू शकत नाही. कुठेही आणि केव्हाही असल्याने सत्यास

झाकाळलेले दिसते की सर्व शक्तीनिशी तो स्वतःस त्यात झोकून देतो आणि सत्यास प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो आणि ते सत्य पूर्णपणे प्रस्थापित होईपर्यंत स्वस्थ बसू शकत नाही.

मानवी प्रश्नातील सत्याचा शोध ही अवघड बाब आहे. मानवी समस्या दोऱ्यांच्या गुंत्याप्रमाणे असतात. दोऱ्याच्या गुंत्यात अनेक पदर अनियमितपणे एकमेकांत गुंतलेले असतात. त्यामुळे तो गुंता संयमाने व हळूवारपणे सोडवावा लागतो. घाई किंवा हिसका हिसकी केल्यास गुंता सुटण्यापेक्षा दोराच तुटण्याची शक्यता असते. मानवी प्रश्नांचे तसेच असते. येथेही सत्य समस्येच्या अनेक पदरात कमी अधिक प्रमाणात गुंतलेले असते. हिंसक मार्गाचा अवलंब केल्यास त्या समस्येत गुंतलेले सत्य मुक्त होण्यापेक्षा त्याचा नाश होण्याचीच शक्यता जास्त असते. म्हणून मानवी समस्या संयमाने आणि हळूवापणेच हाताळाव्या लागतात. म्हणूनच सत्याग्रह हा अहिंसात्मक असावा लागतो. त्यात हिंसेने प्रवेश केल्यास तो सत्याग्रह राहत नाही तर दुराग्रह बनतो. अशा दुराग्रहाने सत्यास हानी पोचते.

सत्याग्रह आणि अहिंसा यांच्यातील अन्योन्य संबंध दाखवताना गांधीजी आणखी पुढे जातात. अहिंसा हा सत्याचा कृतिशील आविष्कार आहे हे वर आलेच आहे. सत्याविषयीच्या ज्ञानाचा तो आचरणात्मक परिणाम आहे, तर सत्याग्रह हा ते सत्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न आहे. तेव्हा सत्याग्रह आणि अहिंसा हे एकाच सत्याशी निगडित असलेले व्यवहार आहेत, किंबहुना एकाच गोष्टीची ही दोन नावे आहेत. त्यांना परस्परांपासून वेगळे काढणे अशक्य आहे.

सत्याग्रही हा असत्य, अन्नाय इत्यादींना शत्रू मानतो, ते बाळगणाऱ्या व्यक्तीस नव्हे. असत्य बाळगणाऱ्या किंवा अन्याय करणाऱ्या व्यक्तीबद्दल त्याला शेवटी सहानुभूतीच असते. याचा संघर्ष त्या व्यक्तीविरुद्ध नसतो, त्याच्या या वाईट प्रवृत्तीविरुद्ध असतो. तो आपल्या अहिंसात्मक सत्याग्रही संघर्षाद्वारे त्या व्यक्तीस या प्रवृत्तीपासून मुक्त करू पाहत असतो. त्या व्यक्तीस इजा करणे हा त्याचा उद्देश नसतो. उलट त्यास इजा होऊ नये यासाठी तो जागृतपणे प्रयत्नशील असतो. म्हणून त्यास आपला संघर्ष अशा रीतीने द्यावा लागतो की अन्यायाचा आणि त्याच्या मुळाशी असलेल्या असल्याचा नाश व्हावा, परंतु या प्रवृत्ती बाळगणारास मात्र इजा होऊ नये वेगळ्या शब्दांत अन्याय करणाऱ्याच्या मतपरिवर्तनाचा तो संघर्ष असतो. म्हणूनच हितसंबंधासाठी होणाऱ्या अन्य लढ्यांपेक्षा सत्याग्रही लढा हा पूर्णत: निराळा असतो. त्यामुळेच अन्य लढ्यात हिंसेला पर्याय नसतो, तर सत्याग्रही लढ्यात हिंसेला स्थान नसते.

सत्याग्रहीची बाजू ही सत्याची म्हणजेच ईश्वराची बाजू असते. या लढ्यातील यशापयश हे व्यक्तीशः सत्याग्रहीचे यशापयश नसते. ते सत्याचे म्हणजे ईश्वराचे यशापयश असते. म्हणूनच एक, दोन, तीन सत्याग्रही लढ्यात कामी आल्यावरून या लढ्यातील यश किंवा अपयश ठरत नसते. अंतिमतः त्याच पक्ष विजयीच होणार असतो. त्याची बाजू ही ईश्वराची बाजू असल्यामुळेच लढ्याच्या काळात सत्याग्रहीवरील अत्याचार जसजसे वाढत जातात तसतसा व्यापक सहानुभूतीच्या स्वरूपात विश्वात्मक ईश्वराचा त्याला पाठिंबा मिळू लागतो. म्हणजेच अत्याचाराने सत्याग्रहीची बाजू दुबळी होण्याऐवजी अधिक मजबूत आणि भक्कम होत जाते. गांधीजी लिहितात, “आपण हिंसात्मक पातळीवरून त्यांच्याशी दोन हात करावे असे ब्रिटिशांना वाटते. कारण तेथे त्यांच्याजवळ शस्त्रे असतात आणि आपण निःशस्त्र असतो. या लढ्यात आपल्याला हमखास यश हवे असेल तर आपण तो अशा पातळीवर ठेवला पाहिजे जिथे आपल्याजवळ शस्त्रे असतील आणि त्यांची शस्त्रे कुचकामी झालेली असतील. “

आहिंसात्मक सत्याग्रहाचे सामर्थ्य विशद करताना गांधीजी आणखी पुढे जातात. ते म्हणतात, “अहिंसात्मक पातळीवर सत्याविषयीचा आग्रह चालू ठेवल्याने केवळ तटस्थांचीच सहानुभूती सत्याग्रहीस मिळते असे नव्हे, तर खुद्द शत्रुपक्षातील विवेक हळूहळू जागा होऊ लागतो आणि नि:शस्त्र लढा शस्त्रबळाने चिरडून टाकण्याचा त्याचा निश्चय लुळा पडू लागतो.” दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिश सेनाधिकारी जनरल स्मटसू याच्या निराशमय उद्गारावरून गांधीजींच्या या

विधानाची सत्यता पटू लागते. तो म्हणतो, "आंग्ल संपकऱ्यांप्रमाणे तुम्हीही हिंसेवर उतरावे असे मला नेहमी वाटते, कारण तशा स्थितीत तो संप कसा मोडून काढावा हे आम्हाला चांगले माहीत आहे; परंतु तुम्ही तर शत्रूलाही इजा करणार नाही, तुम्ही केवळ आत्मक्लेशाच्या साहाय्याने विजय मिळवू इच्छितात आणि सौजन्य आणि सहानुभूतिविषयक स्वतःच स्वतःवर लादून घेतलेल्या मर्यादांचे कधी उल्लंघन करीत नाहीत आणि नेमके त्यामुळेच आम्ही असाहाय्य बनतो." याचा अर्थ असा की अहिंसात्मक सत्याग्रह शत्रूच्या सद्सद्विवेक बुद्धीलाच हात घालतो. स्टेनले जोन्स अत्यंत मार्मिकपणे याचे वर्णन करतो. तो लिहितो, "गांधीजी शत्रूंच्या चिलखतापलीकडील सद्सद्विवेकावर हल्ला करीत होते आणि एक महान राष्ट्र (ब्रिटिश सामाज्य) त्या हल्ल्यास प्रत्युत्तर देत होते. परंतु त्याच्या आत्म्यावर होत असलेल्या हल्ल्याने ते उत्तरोत्तर कोमेजत होते, पराभूत होत होते."

**संदर्भ सूची**


१. Harijan, 16th May 1936.
२. Young India, 21 Jan 1926.
३. पाहा : Harijan
४. गांधीजी लिहितात -
५. He is an impersonal power which sustains the universe, the Supreme spirit which is all pervading and all Embracing One yet many, smaller than the atom and bigger than the Himalayas, contained in a drop of the ocean and yet some- thing which not all the seven seas can encompass" - Harijan
६. १९१४ मध्ये हिंदू इच्छिणाऱ्या एका ज्यू स्त्रीला गांधीजींनी लिहिले: "तुम्ही हिंदू होण्याची आवश्यकता नाही. तुम्ही खऱ्या अर्थाने ज्यू बनलात तरी पुरे आहे. जर तो धर्म तुम्हाला समाधान देत नसेल तर मग जगातील अन्य कोणताही धर्म तुम्हाला कायम स्वरूपाचे समाधान देऊ शकणार नाही.
७. पाहा : C. Rajgopalachari, Gandhiji's Teachings and Philosophy Bombay, 1963, p.
८. Young India, 1921.